!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५७ २०-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर शहरासाठी १२५ सिटी बस येणार

## खासदार चंद्रकांत खैरे यांना एस टी महामंडळाच्या कार्यकारी संचालकाचे आश्वासन

**संभाजीनगर ( ता.२० ) :** संभाजीनगर शहरासाठी शहर बस सेवा ही एसटीनेच चालवावी त्यासाठी काटेकोर नियोजन करावे व बस गाड्यांची संख्या वाढवावी अशा सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी प्रादेशिक व्यवस्थापक अनंत मुंडीवाले यांना दिल्या. व शहरासाठी आवश्यक १२५ बसेसच्या प्रस्तावावर सकारात्मक विचार करा अशी मागणी एसटी महामंडळाच्या कार्यकारी संचालक रणजितसिंग देवल यांच्याकडे केली. त्यांनी प्रस्तावावर सकारात्मक विचार करु असे आश्वासन खासदार चंद्रकांत खैरे यांना दिले.

सुभेदारी विश्रामगृह येथे आज शहर बस सेवेसंदर्भातील अडचणी संदर्भात शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकित शहरबसेसचे काटेकोर सुक्ष्म नियोजन करुन वेळापत्रक गाड्यांच्या फेऱ्या प्रवाशांना माहिती होण्यासाठी प्रसिध्द करा व आता दाखल होणाऱ्या मीनी बस दोन दरवाज्यांची व्यवस्था करुन शहर बस सेवेत दाखल करण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या. सातारा देवळाई, नारेगाव, हर्सुल, जटवाडा, हनुमान टेकडी, विद्यापीठ परिसरात बल व रेल्वे गाड्यांच्या वेळा यांचा ताळमेळ घालुन बस सेवा चालु करा व चौकशी केंद्रावर पूर्णवेळ कर्मचारी नियुक्त करण्यासही त्यांनी सांगितले. रस्त्याच्या दोन्ही बाजुला बस स्टॉपची उभारणी करण्याची मागणी युवासेनेचे जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे यांनी बैठकित केली. त्याला प्रादेशिक व्यवस्थापकांनी होकार दर्शवून तसे प्रस्ताव तयार करण्याचे आदेश विभागीय अभियंत्यांना दिले. नका बस थांब्यांच्या उभारणीचा प्रस्ताव तयार करा व त्यासाठी आवश्यक निधी मी खासदार निधीतुन उपलब्ध करुन देतो अशी ग्वाही खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिली. एसटीची शहर बस सेवा ही सर्वसामान्यांना परवडणारी आहे त्यासाठी गाड्यांचे मार्ग, टप्पे, भाडे, वेळापत्रक यांची माहिती जनतेत पोहचवण्यासाठी व्यापक मोहिम राबवण्याच्या सुचना ही खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या.

बैठकिस सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, नगरसेवक तथा जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, प्रादेशिक व्यवस्थापक अनंत मुंडीवाले, विभाग नियंत्रक राजेंद्र पाटील, विभागीय अभियंता मिनल मोरे, एसटीचे सल्लागार समिती सदस्य सुभाष देशमुख, एसटी कामगार सेनेचे कार्याध्यक्ष पंढरीनाथ काळे, चिटणीस संजय नालमवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525